**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 03-10-2025**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-10-03 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-10-04 | 2025-10-05 | 2025-10-06 | 2025-10-07 | 2025-10-08 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 6.5 | 7.6 | 12.3 | 6.4 | 5 |
| कमाल तापमान (अं.से) | 29.7 | 30 | 29.7 | 29.7 | 29.8 |
| किमान तापमान (अं.से) | 23.7 | 23.6 | 23.2 | 22.8 | 22.5 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 94.3 | 93.7 | 94.4 | 93.4 | 93.5 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 70.2 | 69.3 | 70.7 | 64.8 | 65.5 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 7.2 | 6.6 | 5.4 | 4.8 | 5.1 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 323.2 | 310.6 | 323.2 | 318 | 320.7 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 7 | 8 | 6 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक ०४ ते ०८ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक ०४, ०५, ०६ आणि ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • दिनांक ०४, ०५ आणि ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी तुरळक (एक/दोन) ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • पुढील ४८ तासांत विदर्भात कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होईल, त्यानंतर कमाल तापमानात कोणताही मोठा बदल अपेक्षित नाही. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक ०८ ते १४ ऑक्टोबर २०२५ दरम्यान सरासरी एवढा पाऊस होण्याची शक्यता, तर कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

• हलक्या पावसाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील सोयाबीन उडीद, मुग इत्यादी पिकाची कापणी व मळणीची कामे लवकरात लवकर उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. मळणी शक्य नसल्यास कापणी केलेले पीक उंचवट्यावर शेतात किंवा मळणी यार्डमध्ये साठवावा. स्थानिक पावसाची उघडीप बघून मळणी उरकून घ्यावी. पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी कापणी केलेले पीक प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीने झाकून ठेवावे. • हलक्या पावसाची, मेघगर्जना, विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे अति सकाळच्या वेळेमध्ये उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. • अत्यावश्यक कृषी रसायनांच्या फवारणीची कामे कोरड्या, स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परीस्थिती असताना करावी. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• हलक्या पावसाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील सोयाबीन उडीद, मुग इत्यादी पिकाची कापणी व मळणीची कामे लवकरात लवकर उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भात | • किड व रोग व्यवस्थापन:- १) खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी, पिकाची वरचेवर पाहणी करून किडग्रस्त फुटवे मुळासकट काढून नष्ट करावी हे काम हंगामात किमान ३-४ वेळा करावे. हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. बुरशीजन्य किटकनाशके जसे मेटारायझीयम, बिव्हेरिया @४० ग्राम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात वापर करावा. शेतात ५ टक्के किड ग्रस्त फुटवे दिसताच अॅझाडीरेक्टीन ०.१५ टक्के @३० ते ५० मि.ली. किंवा क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही @२६ मि.ली. किंवा कार्बोसल्फान २५ टक्के @१६ मि.ली. किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी किंवा कर्बोफ्युरॉन ३ टक्के दाणेदार @२५ कि./हे. किंवा फिप्रोनील ०.३ टक्के दाणेदार @१६.६७ कि. /हे. याप्रमाणे बांधीमध्ये टाकावे. किंवा शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि. ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी असतांना टाकावे. रासायनिक किटकनाशक वापरतांना सुरक्षेची सर्व काळजी घेऊनच वापर करावा. २) गादमाशी:- कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार @ २५ किलो ग्रॅम प्रती हेक्टरी बांधीमध्ये ७ ते १० सेमी. पाणी, असतांना वापरावे. बांधीमधील पाणी ४ ते ५ दिवस बांधीबाहेर काढू नये. • ३) तुडतुडे :- धान पिकावर तुडतुडे यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी त्यांच्या नियंत्रणासाठी मेटारायझियम अनिसोप्ली या जैविक बुरशीचा १.१५ % @ २.५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर या प्रमाणात बांधीमध्ये वापर करावा. तुडतुड्यांची आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच नियंत्रणासाठी बुप्रोफेजीन २५ % प्रवाही @१६ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एस. एल. @२.० मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. @ २० मि.ली. किंवा फ्लोनीकॅमीड ५० डब्लु.जी. @ ३.० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ४) करपा:- हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा मेंकोझेब ७५% प्रवाही @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ५) कडाकरपा:- कॉपर हैड्रॉकसाईड ५३.८ % टक्के डी एफ @ ३० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन @ १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • पाणी व्यवस्थापन:- १) धान लावणीनंतर रोपाची मुळे चांगली रुजेपर्यंत बांधीत पाण्याची पातळी २.५ से.मी. (एक इंच) ठेवावी. यानंतर दाणा पक्व होईपर्यंत ही पातळी साधारणतः ५ सें.मी. (दोन इंच) पर्यंत वाढवावी. • २) धान पिकात पीक निसवण्यापूर्वी १० दिवस व पीक निसवल्यानंतर १० दिवस पाण्याची पातळी १० सें.मी. (चार इंच) ठेवावी. पीक फुलोरा अवस्थेत असताना पाण्याचा ताण पडू देऊ नये. |
| कपाशी | • अत्यावश्यक कृषी रसायनांच्या फवारणीची कामे पावसाच्या उघडिपीनंतर स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परीस्थिती असताना करावी. • पिक क्षेत्रामध्ये पावसाचे पाणी साचून असल्यास तात्काळ निचरा करावा. • कपाशीमध्ये आकस्मिक मर आढळून येऊ शकते, प्रभावित झाडांना ताबडतोब कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्ल्यूपी @ ३० ग्रॅम किंवा कार्बेंडाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम + युरिया १५०-२०० ग्रॅम याचे मिश्रण १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, • कपाशीच्या पात्या व फुले नैसर्गिकरित्या गळू नयेत म्हणून एनएए ४.५ एसएल @ 3.5 मिली / १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि कापसाच्या अतिरिक्त वनस्पतींच्या वाढीस प्रतिबंध करण्यासाठी मेपिक्वॅट क्लोराइड @ १०-१२ मिली / १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कपाशीच्या फुलोऱ्याच्या अवस्थेत २ % युरिया आणि बोंडाच्या वाढीच्या अवस्थेत २% डीएपीची फवारणी करावी. • रसशोषक किडी आणि बोंडअळीचा प्रादुर्भाव नियंत्रित करावा. रसशोषक किडींच्या व्यवस्थापन करण्यासाठी, इमिडाक्लोप्रिड १७.८ % @ ६० मिली किंवा फ्लोनिकामिड ५० डब्ल्यूजी @ ८० ग्रॅम किंवा डायनोटेफ्युरन २० एसजी @ ६० ग्रॅम किंवा टोल्फेनपायरड १५ ईसी @ ३०० मिली प्रति एकर फवारणी करावी. • गुलाबी बोंड अळीच्या देखरेखीसाठी फेरोमोन सापळे @ ५/हेक्टर उभारावे आणि कापसावर नीमार्क 5 % फवारणी करावी. • गुलाबी बोंड अळीच्या निरीक्षणासाठी २० झाडामध्ये प्रादुर्भाव पाहावा, किडीचा प्रादुर्भाव आर्थिक पातळी गाठत असल्यास (प्रति सापळा ५-८ पतंग सलग ३ रात्री), नियंत्रणासाठी प्रोफेनोफॉस ५० ईसी @ ६०० मिली किंवा ईमामेक्टिन बेंझोएट ५ % एसजी @ १०० ग्रॅम किंवा इंडोक्साकार्ब १४.५ % एससी @ २०० मिली किंवा क्लोरपायरीफॉस २० % ईसी @ ५०० मिली प्रति एकर फवारणी करावी. • बुरशीजन्य पानांवरील ठिपके आणि बोंड सड पासून बचाव करण्यासाठी, ॲझोक्सीस्ट्रोबिन १८.२% + डायफेनोकोनाझोल ११.४% एससी @ १ मिली किंवा प्रोपिकोनाझोल १ मिली किंवा थायोफॅनेट मिथाइल ७० डब्ल्यूपी @ २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ ०.४ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्ल्यूपी @ २.५ ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३ एससी @ १ मिली किंवा प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी @ २.५ ग्रॅम किंवा मेटिराम ५५% + पायराक्लोस्ट्रोबिन ५% डब्ल्यूजी @ २ ग्रॅम किंवा फ्लक्सापायरोक्सॅड १६७ ग्रॅम/ली + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/ली एससी @ ०.६ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोनदा पानांवर फवारणी करण्याची शिफारस केली जाते. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | • उताराच्या दिशेने शेतात साचलेले पाणी काढून टाकणे आवश्यक आहे. अंदाजित पावसामुळे, परिपक्व अवस्थेतील सोयाबीन पिकाची कापणी करावी, जर कापणी शक्य नसेल तर कापणी केलेले पीक उंचवट्यावर शेतात किंवा मळणी यार्डमध्ये साठवण्याचा सल्ला दिला जातो. नुकसान टाळण्यासाठी कापणी केलेले पीक प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीने झाकून ठेवा. |
| तूर | • तूर उत्पादन वाढीसाठी शेंडा खुडणी फायदेशीर :- पेरणीनंतर साधारण ४० ते ४५ दिवसांनी पहिली शेंडी खुडणी करावी, दुसरी शेंडा खुडणी ६० ते ६५ दिवसांनी करावी जेणेकरून अधिक फुटवे व उपफांद्या येतात. शेंडा दोन ते तीन इंच खुडावा याकरिता शेतकऱ्यांनी हातानी खुडणी करावी. खुडणी झाल्यानंतर स्फुरद अन्नद्राव्य दिल्यास फुलोरा आणि शेंगाची लागवणही होऊन उत्पादनात चांगली वाढ होते. • अनुकूल हवामानामुळे खरीप तूर पिकात करपा/मर रोगाची लक्षणे आढळून येतात, त्यामुळे नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०%डब्ल्यूपी @ २५ ग्रॅम किंवा कॅप्टन ७५%डब्ल्यूपी @ २० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी. तूर पिकात आढळणाऱ्या फायटोप्टोरा करपा (खोंड कुजणे किंवा खोडाचा करपा) च्या प्रादुर्भावाच्या नियंत्रणासाठी फॉसेटाइल एएल ८०%डब्ल्यूपी @ २० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मुग | • पावसाचा अंदाज लक्षात घेता उडीद व मुग पिकाची काढणी करून शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवावा. |
| मका | • मक्यावरील लष्करी अळीच्या सौम्य प्रादुर्भावासाठी रेशमी अवस्थेत कीटकनाशकांचा वापर करणे शक्य होणार नाही. त्याऐवजी अंडी अळ्या नियमितपणे यांत्रिक पद्धतीने वेचून नष्ट करा. |
| करंडई | • ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करडईची (भीमा, एकेएस-२०७, पीकेव्ही-गुलाबी, नारी-६) लवकर पेरणी केल्यास मावा किडीच्या प्रादुर्भावामुळे होणारे नुकसान टाळता येते, तथापि, मध्यम ते मुसळधार पावसाच्या अंदाजादरम्यान पेरणी टाळा. • अॅझाटोबॅक्टर + पीएसबी (प्रत्येकी २५ ग्रॅम/किलो बियाणे) आणि जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा @ ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्याने बियाणे प्रक्रिया करावी.. |
| हरभरा | • कोरडवाहू हरभरा (जाकी ९२१८, पीडीकेव्ही कांचन, विजय) ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत पेरता येतो. रायझोबियम + पीएसबी (प्रत्येकी २५ ग्रॅम/किलो बियाणे) आणि जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा @ ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्याने बीजप्रक्रिया करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • अत्यावश्यक कृषी रसायनांच्या फवारणीची कामे पावसाच्या उघडिपीनंतर स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परीस्थिती असताना करावी. • कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट किंवा देठ सुकणे- कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट मुळे होणाऱ्या फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी* २.५ ग्रॅम प्रति लिटर किंवा अझोक्सीस्ट्रोबिन+ डायफेनकोनाझोल* १ मिलि प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. • ग्रेसी स्पॉट- खाली पडलेल्या पानांचा खच यांचे विघटन जलद गतीने होण्याकरिता काडीकचरा विघटन करणाऱ्या ईतर उपयोगी बुरशींचा (शेणखता सह मिश्रित बायो-डिकंपोझर (१ किलो/ झाड) वापर करावा. साधारणतः झायनेब# (२० ग्रॅम/१० लि. पाणी) किवा होर्टीकल्चरल मिनरल ऑइल २% (२०० मिलि १० लिटर पाणी) किवा पूर्व मिश्रित बुरशीनाशक हेक्साकोनाझोल ४ % + झायनेब ६८ % डब्लुपी १५ ग्रॅम/१० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मिनरल ऑइल किवा बुरशीनाशकांचा वापर केल्याने पानामध्ये बीजाणूंचा प्रवेश कमी होतो तसेच बीजाणूंची उगवण कमी होते. बुरशींचा संसर्ग झाला असल्यास लक्षणांच्या विकासास प्रतिबंध किंवा विलंब होतो त्याच बरोबर तेलकट चट्टे यांची तीव्रता कमी दिसून येते. • ब्राऊन रॉट (फळावरील तपकिरी कूज) सर्वप्रथम झाडांवर गळून पडलेल्या पानांची व फळांची विल्हेवाट लावावी ती शेतात तसीच राहू देऊ नये अन्यथा या रोगाची तीव्रता वाढण्यास मदत होऊन संक्रमण जलद गतीने होते. वाफा स्वच्छ ठेवावा, फळबागेत फळांचे ढीग कुठेही ठेवू नका कारण ते रोगाचे प्रसार करण्याचे कार्य करतात. फायटोप्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फॉसिटील ए.एल.* २.५ ग्रॅम किवां कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डब्लूपी* ३ ग्रॅम प्रती लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. फवारणी करतांना झाडाच्या परिघातामध्ये सुद्धा फवारणी करावी, जेणेकरून खाली पडलेली फळे उचललेली नसल्यास त्यावरील बुरशीचा नायनाट होईल तसेच जमिनीमधील सक्रीय बीजाणू यांचा नायनाट होण्यासाठी मदत होईल. चांगले परिणाम मिळण्यासाठी या कृषी रसायनामध्ये इतर कोणतेही तत्सम बुरशीनाशके/ कीटकनाशके/विद्राव्य खते मिसळू नये. फायटोप्थोरा बुरशीचा मुळांवर प्रादुर्भाव असल्यास सायमोक्सणील ८% + मंकोजेब ६४% डब्लूपी# (मिश्र घटक असलेले) बुरशीनाशक २५ ग्रॅम १० लिटर |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | पाण्यात मिसळून या मिश्रणात जवस तेल २.५ मिलि मिसळून असे द्रावण वाफ्यात मिसळावे किंवा मेटलक्सील एम ३.३ % क्लोरोथालोनील ३३.१% एससी# (मिश्र घटक असलेले बुरशीनाशक २० मिली १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण वाफ्यात टाकावे. • फळमाशी- फळमाशीच्या नरांना आकर्षित करण्याकरिता फळमाशी सापळे (मिथिल यूजोनौल) प्रती हेक्टरी २५ या प्रमाणात तोडणीच्या साधारण २ महिने आधीपासून बागेत झाडांवर टांगून ठेवावेत. बागेतील खाली पडलेली फळे वेचून नष्ट करून बाग स्वछ ठेवावी. फळमाशीची कोषावस्था जमिनीत २ ते ३ सेंटिमीटर खोलीपर्यंत असते. झाडाखालील माती हलवून किंवा निंदून घ्यावी. • फळातील रस शोषण करणारा पतंग संत्रा रस शोषक पतंग किडीसाठी संत्रा पिकाच्या व्यतिरिक्त असलेल्या यजमान तणाचां नाश करावा उदा. गुळवेल, वासनवेल, चांदवेल इ. यजमान तणावर या किडीची अळी अवस्था राहते. साधारणतः सायंकाळीच्या वेळी (७ ते रात्री ११) या कालावधी मध्ये बागेच्या बांधावर गवत पेटवून धूर करावा, फळ पक्वतेच्या वेळी बागेच्या चार हि कोपऱ्यामध्ये तसेच मध्यभागी एक मर्क्युरी प्रकाशाचे दिवे लावावेत. रसशोषण करणाऱ्या पतंगाकरिता विषारी आमिषे तयार करुन बागेत ठेवावी. या करीता मॅलॅथिऑनं ५० ईसी २० मिली २०० |
| वांगे | • मागील आठवड्यातील पाऊस, उच्च आर्द्रता आणि ढगाळ हवामानामुळे, वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास कार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवा डेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवा स्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवा थियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. |
| अळशी | • कोरडवाहू जवसाची (PKV-NL-260) पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत करता येते. ॲझाटोबॅक्टर + पीएसबी (प्रत्येकी २५ ग्रॅम/किलो बियाणे) आणि जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा @ ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्याने बीजप्रक्रिया करावी. |
| मिरची | • मिरची पिकात शेंडे मर व फळ सड या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास व्यावास्थापानासाठी डायफेनकोनाझोल २५ ईसी @ ५ मिली किंवा ॲझोक्सीस्ट्रोबिन २३ % एससी @ १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • भारतीय कृषि अनुसंधान संस्थेच्या राष्ट्रीय पशुरोग महामारीशास्त्र व माहिती विज्ञान संस्थान, बंगळूर यांच्या अंदाजानुसार ऑक्टोबर महिन्यात महाराष्ट्रातील पशुधनाला फॅसिओलायसिस, लम्पी स्किन डिसीज (LSD), घटसर्प (HS) व आंत्रविषार (ET) या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. संभाव्य नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी योग्य प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात. • फॅसिओलायसिस (लिव्हर फ्लूक रोग) या आजारापासून बचावासाठी जनावरांना पाणथळ भागात चरण्यास नेऊ नये. गोठा कोरडा ठेवावा आणि योग्य निचरा होईल अशी व्यवस्था करावी. जनावरांना बोअरवेल किंवा ट्यूबवेलमधील स्वच्छ पाणीच द्यावे. पाणथळ भागातील चारा टाळावा. पशुवैद्यकांच्या सल्ल्याने क्लोझॅन्टेल, ट्रायक्लोबेंडाझोल किंवा रॅफॉक्सॅनाईड या फ्लूकनाशक औषधांनी जंतनाशन करावे व नियमित जंतनाशन करून परजीवींचा जीवनचक्र खंडित करावा. • लम्पी स्किन डिसीज (LSD) पासून बचावासाठी गोठ्यात हवा खेळती ठेवावी व डास व माश्यांपासून बचावासाठी जाळ्या लावाव्यात. गोठ्याची स्वच्छता राखावी व चुना/जंतूनाशक टाकावे. जनावरांना संतुलित आहार, खनिज मिश्रण व स्वच्छ पाणी पुरवावे. राज्य पशुवैद्यकीय विभागाच्या मार्गदर्शनानुसार गोटपॉक्स किंवा LSD लस देणे आवश्यक आहे. गोठ्याभोवती सायपरमेथ्रिन किंवा डेल्टामेथ्रिन कीटकनाशकाची फवारणी करून डास, माश्या व गोचीड यांचे नियंत्रण करावे. • घटसर्प (HS) या आजारासाठी गोठे स्वच्छ ठेवावेत व जनावरांची गर्दी टाळावी. हवामानातील अचानक बदलापासून जनावरांचे संरक्षण करावे. हिरवा चारा व संतुलित आहार पुरवावा तसेच स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे. गायी व म्हशींना पावसाळ्यापूर्वी किंवा लगेच HS लस द्यावी. नियमित जंतनाशन व बाह्य परजीवी नियंत्रण करून जनावरांवरील ताण कमी करावा. • आंत्रविषार (ET) हा आजार प्रामुख्याने मेंढ्या व बकरींमध्ये दिसून येतो. उन्हाळ्यानंतर लगेच गवताळ चाऱ्यावर अचानक सोडू नये. गोठा कोरडा व स्वच्छ ठेवावा. आहारात अचानक बदल करू नये. दाणेदार खुराक देण्यापूर्वी भरड चारा द्यावा. मेंढ्या व बकरींना ET (क्लॉस्ट्रिडियल) लस द्यावी. नियमित जंतनाशन करून पचनसंस्थेवरील परजीवींचा ताण |

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| | कमी करावा. • पूरग्रस्त जनावरांसाठी (गायी, म्हशी, बैल, शेळ्या, बकऱ्या) विशेष काळजी आवश्यक आहे. जनावरांना कोरड्या व उंच जागी हलवावे. कोरडे बिछाने द्यावे व गोठा स्वच्छ व जंतुनाशकयुक्त ठेवावा. बुरशी लागलेला किंवा ओली चारा टाळावा आणि स्वच्छ पाणीच द्यावे. जखमा, पायाची कुज किंवा माशीचे प्रादुर्भाव आढळल्यास तत्काळ उपचार करावेत. पूरानंतर जनावरांना जंतनाशन करावे, लसीकरण पुन्हा सुरू करावे व डास-माश्यांपासून बचावासाठी कीटकनाशकांचा वापर करावा. • सर्वसाधारण सल्ला म्हणून, पशुपालकांनी लसीकरण व जंतनाशन याची नोंद ठेवावी. कोणताही वेगळा आजार किंवा अचानक मृत्यू झाल्यास जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात किंवा कृषी विज्ञान केंद्रात कळवावे. तसेच पशुधन विमा उतरवून आर्थिक संरक्षण मिळवणे आवश्यक आहे. |